भाग ११

।। चिंतनक्षण ।।

डॉ. सुहास पेठे

।। श्री ।।

।। चिंतनक्षण ।।

भाग : ११

डॉ. सुहास पेठे
एम्.ए., पीएच्.डी. (तत्त्वज्ञान)

*** चिंतनक्षण : भाग-११ ***

पुस्तकरूपाने प्रकाशित सातवी आवृत्ती : सप्टेंबर २०१४

डिजिटल आवृत्ती : डिसेंबर २०२१

© डॉ. सुहास पेठे , सातारा, महाराष्ट्र

डॉ. सुहास पेठे यांच्या अन्य साहित्यासाठी पहा :

वेबसाईट : www.pethekaka.com

युट्यूब चॅनेल : Shri Pethe Kaka

अँड्रॉईड ॲप : SadhanNandadeep (साधननंदादीप)

साधक म्हणवणाऱ्या अनेकांचा रंग
इतका कच्चा असतो, की
जरा संकटांच्या किंवा मनाविरुद्ध
घटनांच्या पाण्यातून त्यांना काढले,
की तो रंग उडतो.३०१

‘काल-परवा-तेरवा’चे साठवायला लागले म्हणजे धोकादायक आणि चिंताजनक ‘अलीकडे’ तयार होतो आणि ‘आज’चे ताजेपण, नावीन्य, प्रगतीच्या सर्व शक्यता आणि आनंद तो घालवतो.३०२

उपासनेत स्थैर्य व भर
हा उपासनेचा
पुढचा टप्पा आहे.[३०३]

प्रवाही व धैर्यशील राहून स्वतःचे
शुद्धीकरण स्वतः करू शकणाऱ्याला बाह्य
संस्कारांची आणि साधनांची विशेष गरज
उरत नाही - जशी नदीला तुरटीची!
इतरांनी मात्र सावध राहिलेलेच बरे!३०४

खऱ्या पारमार्थिकाने
प्रगतीसाठी, निव्वळ उत्सवी
परमार्थापासून दूर राहाणे
त्याच्याच हिताचे आहे![३०५]

मंदिरे एका बाजूने अनेक
कारणांनी आवश्यक, पण दुसऱ्या
बाजूने माणसांच्या मनातली देवाची
दुबळी ओढ आणि जगण्यातला
देवत्वाचा अभाव दर्शवतात. ३०६

वृक्ष वाढतो तेव्हा त्याला फांद्या फुटतात, त्यातून अधिक, स्वतंत्र, चांगले वृक्षही निर्माण होतात. त्याला 'वृक्षविस्तार' म्हणतात. वृक्षाची 'फाटाफूट' नव्हे. तीच गोष्ट गुरू-शिष्य आणि संप्रदाय यांची आहे !३०७

गुरूंनी दिलेले नाम म्हणजे जणु
तयार रोप - ज्याच्या वाढीसाठी
आपल्या बरोबर गुरूही पाणी
घालीत असतात.३०८

अनेक साधकांची अवस्था
अडकलेल्या रुग्णासारखी असते -
धड साधन वाढवीतही नाहीत
आणि सोडूनही देत नाहीत!३०९

पैशाचा संचय असतानाही तो स्वतःच्या देहसुखासाठी व चैनींसाठी खर्च करणे म्हणजे पैशाचा उत्तम, रास्त व कल्याणकारक उपयोग आपल्याला कळत नसल्याची जाहीर कबुली देणे आहे ! ३१०

नामाचे प्रमाण किती असावे -
निदान प्रपंचात उनाडलेल्या
वासराला परत दाव्यावर ओढून
आणण्यासाठी लागणाऱ्या
दोरीच्या लांबीएवढे ! ३११

मनातून ‘स्वतःच्या नावा’चे आणि
त्याच्या गोतावळ्याचे ‘बिऱ्हाड’ जोवर
जागा सोडून पूर्ण जात नाही तोवर
‘भगवंताच्या नामा’ला खऱ्या अर्थाने
तेथे हक्काचे ‘निवासस्थान’ प्राप्त होत
नाही ! ३१२

मुलांची लग्ने करून दिली किंवा झाली म्हणजे आपले मुलांचे पेपर टाकून झाले, आता फार तर अधूनमधून निकाल पाहाणे - तेही त्यांच्या पेपरचे, हे लक्षात ठेवून !३१३

कित्येकदा अडचणी आणि
प्रश्न खूप सोपे वाटतात -
कारण ते
दुसऱ्यांचे असतात! ३१४

मनाने निर्माण केलेला गोंधळ आणि ताणाचे ओझे एकट्याला उचलत नाहीसे झाले म्हणजे तरी निदान, मनोविकारांना सामोरे जाण्यापेक्षा, आपण होऊन ओझे उचलायला तयार असलेल्या भगवंताची उपासनेने मदत घ्यावी.३१५

‘मी’चे बीज दोन प्रकारे नष्ट करता येते - भगवंताच्या भूमीत पेरून, शुद्धतेचे पाणी घालून, विधायकपणे वृक्ष होण्याने किंवा त्याचे खरे स्वरूप जाणण्याच्या अग्नीत भाजून, ते उगवण्याची क्षमता नष्ट करून ! ३१६

पाश्चात्य संस्कृतीने देहबाधित, भोगग्रस्त, मालिकाग्रस्त आणि अंधानुकरणप्रिय पिढ्या आपल्याकडे घडविल्या, याचे आकलन आणि त्यावर योग्य उपाय झाले, तर येथे शांतिमय, स्वावलंबी, समाधानी जीवनाला आरंभ होईल.३१७

प्रापंचिक सुरक्षिततेची गरज म्हणून भिंतींचे घर बांधताना ईशकृपेचे वारे खेळायला स्मरणाच्या खिडक्या आणि मुक्त होण्यासाठी दार ठेवून ज्याने घर बांधले त्याने प्रपंच साधला!३१८

सगळ्या भातुकल्याच चालल्या आहेत - मोठ्यांच्या प्रसिद्धी-पगार-घरेदारे-प्रतिष्ठा देणाऱ्या आणि लहानांच्या खेळाच्या आनंदापेक्षा काहीच न देणाऱ्या - हे कळले तर लहानांना ताण नसतोच, पण मग मोठ्यांनाही तो ताण यायचे कारण नाही.३१९

मनापासून, आवडीने, आपण होऊन
प्रपंचाच्या बंधनात पडलेल्या व तेथेच
आनंद वाटणाऱ्या जिवाला परमार्थाची
गोडी लावून खऱ्या दुःखद असलेल्या
प्रपंचातून सोडवणे हीच परमार्थाची खरी
समस्या आहे ! ३२०

‘जनी वंद्य ते ‘सर्व’भावे करावे का?’ हा प्रश्न आता सध्याची बाह्य परिस्थिती पाहाता कळकळीने खुद्द श्री समर्थांनाच विचारण्यासारखा प्रश्न झाला आहे !३२१

निर्माल्य टाकताना, देव न
टाकण्याची सावधानता
असणाऱ्याला, बिनगरजेची
अंधश्रद्धा त्यागताना गरजेची
श्रद्धा जपणे कळू शकेल!३२२

पूर्वी तपोभंगासाठी अप्सरा पाठवीत असे म्हणतात. आजच्या युगात सदाचरणासारखी कुठलीही तपःश्चर्या करणाऱ्यांसाठी एकच अप्सरा पाठवतात, तिचे नाव - पैसा ! ३२३

निर्गुणाच्या घरातले सगुण हे सर्वांत लहान बाळ आहे. आपल्या घरी कुणी आल्यावर तिथल्या लहान बाळाच्या नावाने हाक मारतात, तेव्हा घरातले कुणीही मोठे ओ देते! दार उघडते! तेच काम सगुण करते!

घर बांधायला दगड लागतात, पण
म्हणून घर बांधल्यावर कुणी दारात
दगडांची रास रचून ठेवीत नाहीत.
तेच खऱ्या गरजा संपल्यावरच्या
पैशाचे आहे ! ३२५

भगवंताचा काय, गुरूंचा काय पहिला कुठलाही छोटासा अनुभवसुद्धा विसरू नये, सोडू नये. कारण त्याच अनुभवाच्या बीजाला पुढच्या छोट्या-मोठ्या अनुभवांचे अंकुर येतात आणि बाग फुलते.३२६

खरा आधार भगवंताचा - कारण
तो नियामक आहे, पण स्वतः
नियमबद्ध नाही. नियमातीत
आहे,पण नियमबाह्य नाही! ३२७

बऱ्याच जणांना मरणाआधी एक मृत्यू असतो याची कल्पनाच येत नाही. म्हणून संतजीवन कळत नाही आणि त्यात नांदणारा परमानंदही कळत नाही.३२८

आपल्या मानवी बुद्धीने साध्या
खऱ्या दृश्याचा पुरता उलगडा होत
नाही, तर त्याच बुद्धीने अदृश्याचा
उलगडा करीन म्हणणे म्हणजे
बुद्धिमंतांचा बालिशपणा आहे ![३२९]

अनेक देवांसमोर, समाध्यांसमोर भक्तांच्या प्रचंड रांगा लागतात. त्या रांगा त्यांच्या 'खऱ्या भक्तां'च्या असत्या तर किती बरे झाले असते!

डॉ. सुहास पेठे यांची ही बोधवचने म्हणजे शुद्ध परमार्थमार्गावरील अभ्यासू व्यक्तींना चिंतनाची एक पर्वणीच होय. कारण या वचनांमागे डॉ. पेठे यांचे तीन तपांचे मूलगामी चिंतन, स्वानुभव, अभ्यास, प्रयोग अशी विस्तृत पार्श्वभूमी आहे. शुद्ध परमार्थाचे आकलन व आचरण यांसाठी त्यांची ही वचने आमच्याप्रमाणे इतरांनाही उपयोगी ठरतील म्हणून संकलित व प्रकाशित होत आहेत.

* संतछाया, सातारा *